दैनिक
# महाराष्ट्र जीत

मुख्य सपादक सागर राणा अभोरे सपादक बद्रूभाऊ इगोले

RNI No - MHMUL/25/A0788

वाशीम ■शुक्रवार दि. 12 ऑगस्ट 2025 ■ वर्ष : 2 रे ■ अंक : 126 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रूपये ■ Title code:- MAHMUL039353

## दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वाटप शिबिर

महाराष्ट्र जीत

**उरण/सायली साळुंके**

दि. 8 सप्टेंबर2025 रोजी ग्रामीण रूग्णालय उरण या रूग्णालयात जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग व मा. मुख्यमंत्री सहायता निधी धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष जिल्हाधिकारी अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग तपासणी व प्रमाणपत्र वाटप शिबिर घेण्यात आले या शिबिरात डॉ. विजय मसकर(मानसोपचार तज्ञ), डॉ. मृणालीली कदम (अस्थिव्यंग तज्ञ ), डॉ. पवन महाजन (नेत्ररोग तज्ञ), डॉ. बाबासो काळेल (वैद्यकीय अधीक्षक) ग्रामीण रुग्णालय उरण, श्री राजू ठाकूर सामाजिक कार्यकर्ते व उरण दिव्यांग सामाजिक संस्थेचे अध्यक्ष श्री. महेंद्र म्हात्रे उपस्थीत होते. या शिबिरात अस्थिरोग तपासणी, नेत्र तपासणी, मानसिक आजाराची तपासणी करून दिव्यांग प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यामध्ये एकूण ११० दिव्यांग लाभार्थीनीं नोंद केली व त्यातील पात्र लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करून तपासणी करून व कागदपत्राची पडताळणी करून दिव्यांग प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. बाबासो काळेल (वैद्यकीय अधीक्षक) तसेच रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष मेहनत केली. तसेच उरण तालुक्यातील सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.




# नेपाळचा पंतप्रधान कोण?

## आंदोलकांमध्येच जुंपली; भारत समर्थक म्हणून सुशीला कार्की यांना एका गटाने नाकारले

**काठमांडू :** नेपाळमध्ये हंगामी सरकारचा प्रमुख नेता आणि पंतप्रधानपदासाठी नाव निश्चित करण्याबाबत जेन झी आंदोलकांमध्ये तीव्र मतभेद होऊन ते दोन गटांत विभागले गेले. इतकेच नव्हे, तर त्या देशाच्या लष्करी मुख्यालयाबाहेर या दोन गटांमध्ये झटापट देखील झाली. त्यात अनेक युवक जखमी झाले. नेपाळच्या माजी मुख्य न्यायाधीश सुशीला कार्की या भारताच्या समर्थक असून, त्यामुळे त्यांच्या नावाचा पंतप्रधानपदासाठी विचार करू नका, असे एका गटाचे मत आहे.

काठमांडूचे महापौर बालेंद्र शाह यांना नेपाळचे हंगामी पंतप्रधान करावे, अशी या गटाची मागणी आहे. जर शाह हे पद स्वीकारत नसतील तर महापौर हरका सम्पांग यांना या पदावर विराजमान करावे, असे या गटाचे मत आहे.



**चर्चा लष्करी मुख्यालयात नको, राष्ट्राध्यक्ष भवनात घ्या**

दुसऱ्या गटाची भूमिका गेल्या दोन दिवसांपासून सैन्य मुख्यालयात आंदोलक गटांशी चर्चा सुरू आहे. मात्र, एक गट म्हणतो की ही चर्चा नेपाळच्या राष्ट्राध्यक्ष भवनात व्हावी, लष्करी मुख्यालयात नव्हे.

काठमांडूमधील अस्थिर राजकीय स्थितीबाबत जेन झीच्या नेत्यांनी प्रथमच उघडपणे आपली भूमिका गुरुवारी मांडली. अनिल बनिया आणि दिवाकर दंगल या नेत्यांनी सांगितले की, वृद्ध नेत्यांच्या भ्रष्ट आणि अपयशी कारभाराविरोधात आम्ही हे आंदोलन सुरू केले आहे.

**संसद बरखास्त करा; आंदोलकांची मागणी**

नेपाळची संसद त्वरित बरखास्त करा, अशी मागणी जेन झीच्या आंदोलकांनी गुरुवारी केली. संविधानात योग्य बदल करून लोकांच्या इच्छेचा मान राखला पाहिजे, असेही आंदोलकांनी म्हटले आहे.

**कार्की यांच्यानंतर कुलमान घीसिंग चर्चेत**

बुधवारी संध्याकाळपर्यंत माजी मुख्य न्यायाधीश सुशीला कार्की यांचे नाव अंतरिम पंतप्रधानपदासाठी निश्चित झाल्याचे वृत्त होते, पण गुरुवारी दुपारपर्यंत 'लाइट मॅन' म्हणून ओळखले जाणारे कुलमान घीसिंग यांचे नाव समोर आले.

धारनचे महापौर हरका संपांग यांनी काठमांडूचे महापौर बालेन शाह यांना भित्रा म्हटले, जो संकटाच्या वेळी लपतो. संपांग म्हणाले की, ते स्वतः देशाचे नेतृत्व करण्यास तयार आहेत, परंतु सैन्याचा पाठिंबा मिळणे कठीण आहे. दुसरीकडे, बालेन यांनी अंतरिम पंतप्रधानपदासाठी सुशीला कार्की यांना पाठिंबा दिला आहे.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मेंडका येथे मा. मिलिंद खोडके सरांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा उत्साहात पार पडला



मेंडका (ता. मुदखेड, जि. नांदेड) :
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेंडका येथील कर्तव्यदक्ष व विद्यार्थ्यांप्रती निस्वार्थ भावनेने कार्य करणारे शिक्षक मा. मिलिंद खोडके सर हे नियत वयोमानानुसार दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सेवेतून निवृत्त झाले. त्यांच्या दीर्घ सेवाकाळातील कार्याचा गौरव करण्यासाठी दि. ०९ सप्टेंबर २०२५ रोजी शाळेत भव्य सेवानिवृत्ती सोहळा आयोजित करण्यात आला.

आखनगिरे सर यांनी सुत्र संचालन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ओमप्रकाश बलदवा सर होते. प्रमुख उपस्थितीत मुख्याध्यापिका पवार मॅडम, बी.ओ. मॅडम प्रिया डाहाळे, केंद्र प्रमुख वारकाड सर, शा.व.स. अध्यक्ष सुभाष जनजावळे, उपाध्यक्ष प्रशांत निखाते, ग्रामपंचायत सरपंच लक्ष्मण ईजळकर, उपसरपंच नारायण निखाते यांचा समावेश होता.व मेंडका नगरीचे पोलिस पाटील गोविंद वसुरे तसेच इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विश्वनाथ चंदलवाड सर, वस्तीशाळा सेवानिवृत्त मुख्याध्यापक बोदमवाड सर, व शंकर पामलवाड सर,गंगाधर दासरे, तुळशीराम चुकेवाड, प्रविण गायकवाड, लक्ष्मण देवदे, कैलास गोडशे, बजरंग खोडके, सूर्यकांत चौदंते, माधव कदम यांच्यासह केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ व अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.

कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी खोडके सरांच्या शैक्षणिक योगदानाचा विशेष उल्लेख केला. त्यांनी आपल्या सेवेत असताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केलेल्या अथक प्रयत्नांचे स्मरण करून त्यांना एक आदर्श शिक्षक म्हणून गौरविले. त्यांच्या कार्यामुळे शाळेचा शैक्षणिक स्तर उंचावला असून, अनेक विद्यार्थी जीवनात पुढे जाण्यास सक्षम झाले आहेत, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात विविध मान्यवरांनी आपली भावना व्यक्त केली व उपस्थितांनी खोडके सरांना सदिच्छा निरोप दिला. शेवटी त्यांना पुढील आयुष्यात आरोग्य, आनंद आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. दैनिक युवा आधार तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते यांच्यासह केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ व अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.

कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी खोडके सरांच्या शैक्षणिक योगदानाचा विशेष उल्लेख केला. त्यांनी आपल्या सेवेत असताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केलेल्या अथक प्रयत्नांचे स्मरण करून त्यांना एक आदर्श शिक्षक म्हणून गौरविले. त्यांच्या कार्यामुळे शाळेचा शैक्षणिक स्तर उंचावला असून, अनेक विद्यार्थी जीवनात पुढे जाण्यास सक्षम झाले आहेत, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात विविध मान्यवरांनी आपली भावना व्यक्त केली व उपस्थितांनी खोडके सरांना सदिच्छा निरोप दिला. शेवटी त्यांना पुढील आयुष्यात आरोग्य, आनंद आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. दैनिक युवा आधार तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते

## आंतरराष्ट्रीय बांबू दिनानिमित्त दोन दिवसांची मुंबईत बांबू परिषद

महाराष्ट्र जीत

**मुंबई,प्रतिनिधी**

फिनिक्स फाऊंडेशन आणि महाराष्ट्र सरकारच्या "महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन" (MITRA) यांच्यामार्फत आंतरराष्ट्रीय बांबू दिनानिमित्त मुंबईत दोन दिवसांची बांबू परिषद आयोजित करण्यात आली आहे. वातावरण बदलाचे संकट रोखून मानव जात वाचवण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय बांबू दिनाचे औचित्य साधून येत्या १८ आणि १९ सप्टेंबर २०२५ मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात दोन दिवसाच्या बांबू परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. "बांबू फॉर पीपल, प्लॅनेट अँड प्रॉस्पेरिटी : ग्रीन गोल्ड, ग्रीन एनर्जी, ग्रीन अर्थ" अशी संकल्पना घेऊन या महत्त्वपूर्ण परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसाच्या परिषदेतून पर्यावरण रक्षण आणि शाश्वत विकासासाठी नवी दिशा मिळेल. राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री पर्यावरण शाश्वत विकास टास्क फोर्सचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल यांनी परिषदेबाबत माहिती देताना सांगितले. पृथ्वी आज अभूतपूर्व पर्यावरणीय संकटांचा सामना करत आहे. वातावरण बदलामुळे जंगलातील आगी, ढगफुटी, महापूर आणि उष्ण लहरी यासारख्या आपत्ती वाढल्या आहेत. बांबू हा 'कल्पवृक्ष' असून, तो कार्बन शोषण, जंगलतोड रोखणे आणि जैवइंधन निर्मितीसाठी उपयुक्त असल्याचे पाशा पटेल यांनी सांगितले. पाशा पटेल म्हणाले, 'जगभरातील देशभरातील आणि राज्यभरातील तज्ञ, अभ्यासक, शास्त्रज्ञ, उद्योजक, शेतकरी आणि धोरणकर्ते यांना मुंबईमधील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात आयोजित या परिषदेसाठी निमंत्रित करण्यात आले आहे. मानव जातीच्या अस्तित्वाबाबत महत्त्वपूर्ण चर्चा आणि दोन दिवसाच्या परिषदेचे आयोजन हे फिनिक्स फाउंडेशन, लोदगा जि.लातूर आणि राज्य सरकारची महाराष्ट्र सरकारच्या "महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन" (MITRA) यांनी संयुक्तपणे केले आहे. काळाची पाऊले ओळखून मानव जातीच्या रक्षणासाठी 18 आणि 19 सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. या परिषदेमध्ये होणाऱ्या दोन दिवसाच्या चर्चासत्रांमध्ये बांबूपासून इथेनॉल, मिथेनॉल, थर्मल साठी बांबू पॅलेट्स, लोखंड चारकोल, लाकूड, फर्निचर, बांबू कपडे असे अनेक उद्योग ,कौशल्य, पर्यावरण, प्लास्टिक मुक्तीतून शाश्वत म्हणजेच सस्टेनेबल डेव्हलपमेंट च्या दिशेने वाटचाल अपेक्षित असणार आहे. शहरी वनीकरण (Ur-ban Forest), ऑक्सीजन पार्क, ग्रीन बिल्डिंग अशा अनेक नवकल्पना या परिषदेतून पुढे येणार आहेत.' बांबू परिषद महाराष्ट्राला बांबू राजधानी बनवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. परिषदेत जगभरातील तज्ञ, शास्त्रज्ञ, उद्योजक, शेतकरी आणि धोरणकर्ते सहभागी होणार आहेत.

## पत्रकारावर खोटे आरोप, जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर

महाराष्ट्र जीत

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड**

युवा ग्रामीण पत्रकार संघ, ढाणकी यांच्या वतीने बंटी दत्तात्रय फुलकोंडवार या पत्रकारावर खोटे आरोप लावून त्याची बदनामी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. पत्रकार संरक्षण कायद्यानुसार दोषींवर दंडात्मक कारवाई करून पीडित पत्रकाराला न्याय मिळावा, अन्यथा संविधानिक मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे. पत्रकार संघाचे अध्यक्ष शे. इरफान शे. गुलाब, सचिव अशोक गायकवाड व उपाध्यक्ष करण भरणे यांच्या सहीने दिलेल्या निवेदनात ग्राम महसूल अधिकारी मोईट (म.) राहुल अशोक भोजने आणि सहाय्यक कृषि अधिकारी सोईट (म.) राहुल उद्धव वाघमारे यांच्या ईशाऱ्यावरून काही लोकांनी बंटी दत्तात्रय फुलकोंडवार यांच्याविरुद्ध खोट्या तक्रारी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदना नुसार, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनुदानापासून वंचित ठेवण्याचा अन्याय उघडकीस आणणाऱ्या फुलकोंडवार यांनी प्रशासनाकडे तक्रार केली होती. परंतु, प्रशासनाने तक्रार निकाली काढण्याऐवजी त्यांच्यावरच आरोप करून त्याची प्रतिमा मळवण्याचा प्रयत्न केला. पत्रकार संघाने स्पष्ट केले की, बंटी फुलकोंडवार हे दत्तात्रय फुलकोंडवार यांचे सुपुत्र असून, त्यांनी शेतकऱ्यांसाठी वंचित अनुदान मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यावर गावातील काही लोकांना हाताशी धरून त्यांच्यावर आरोप लावण्याचा प्रयत्न झाला. यामुळे पत्रकारितेवर घाला येण्याची शक्यता निर्माण झाली असून अशा प्रकारांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी दोषी तलाठी आणि कृषी सहाय्यक यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे आश्वासन प्रशासनाने दिले आहे. निवेदनाची प्रत जिल्हा कृषी अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी उमरखेड यांनाही पाठविण्यात आली असून पत्रकार संरक्षणासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# वेळीच शस्त्रक्रिया केल्याने 'तिला' पुन्हा ऐकू येऊ लागले

## खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये केले यशस्वी शस्त्रक्रिया

महाराष्ट्र जीत

**नवी मुंबई** : सर्व इंद्रियांपैकी सर्वात महत्वाचे इंद्रिये म्हणजे आपले कान. ज्यातून आपण तो आवाज आपल्या मेंदूला ऐकवतो. तेव्हाच आपला मेंदू प्रतिसाद देतो. असेही बरेच लोक आहेत ज्यांना कानातून ऐकण्याची किंवा श्रवणशक्ती कमी होण्याची समस्या आहे. अशाच एका प्रकरणात खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलचे ईएनटी आणि एंडोस्कोपिक सर्जन डॉ. राजेंद्र वाघेला यांच्या नेतृत्वाखाली टिमने एका ३४ वर्षीय महिलेवर यशस्वी उपचार करत तिची श्रवणशक्ती परत मिळाली असून रुग्णाला कामाच्या ठिकाणी कराव्या लागणाऱ्या संघर्षाला पूर्ण विराम मिळाला आणि तिच्या वैवाहिक जीवनातला आनंदही परतला आहे. खारघर येथील ३४ वर्षीय दीपिका गाला (नाव बदलले आहे)* हिला ओटोस्क्लेरोसिसचे निदान झाले, जी एक आनुवंशिक स्थिती असून कानाच्या आतील हाडांच्या जास्त वाढीमुळे बहिरेपणाची समस्या उद्भवते. वर्षानुवर्षे श्रवणयंत्रांचा वापर केल्यानंतर अखेर तिच्यावर स्टेपेडोटॉमी शस्त्रक्रिया करण्यात आली, जिथे एका लहान ३.७५ मिमी टेफ्लॉन पिस्टन इम्प्लांटने तिची श्रवणशक्ती पुनर्संचयित करण्यात आली. आज तिला अगदी स्पष्ट ऐकू येत असून तिच्या वैयक्तिक जीवनातील आनंदाचे क्षण परतले आहेत.

दोन वर्षांपूर्वी दीपिका गाला (नाव बदलले आहे)* (३४ वर्षे) हिला श्रवणशक्ती कमी झाल्याची लक्षणे जाणवू लागली. साध्या संभाषणांमध्ये देखील तिचा गोंधळ उडणे तसेच कामाच्या ठिकाणी तिला संघर्ष करावा लागत होता. कधीकधी तर तिला तिच्या कानात सतत काहीतरी वाजतंय असं अनुभव येऊ लागला, ज्यामुळे ती अस्वस्थ आणि चिंताग्रस्त झाली. जरी तिला यामुळे जास्त वेदना होत नसल्या तरी स्पष्टपणे ऐकू न येणे हे तिच्या एकटेपणाचे कारण ठरत होते.




जेव्हा ती उपचाराकरिता मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल झाली तेव्हा तिच्या काही तपासण्या करण्यात आल्या ज्यात तिच्या कानातील श्रवणशक्ती कमी झाल्याचे आढळून आले. त्यावेळी तिला शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला देण्यात आला होता, परंतु तिने ते मनावर न घेता त्याऐवजी श्रवणयंत्रांचा वापर करण्याता निर्णय घेतला. या उपकरणांमुळे तिला तात्पुरता दिलासा मिळाला मात्र, तिला अजूनही स्पष्ट ऐकू येत नव्हते आणि या उपकरणांमुळे तिला तिच्या सहकाऱ्यांसमोर अस्वस्थ वाटू लागले, ज्यामुळे आत्मविश्वास खालावल्याने त्याचा कामावरही परिणाम झाला.

गेल्या वर्षी तिचे लग्न झाले, मात्र लग्नानंतरच्या पहिल्याच वर्षात घरातील तणाव वाढू लागला. स्पष्टपणे ऐकू न येण्यामुळे पती आणि सासरच्या लोकांमधील गैरसमज वाढत गेले. रोजची संभाषणं वादात बदलू लागली कारण ती अनेकदा योग्य वेळी योग्य प्रतिसाद देऊ शकत नव्हती. ती मानसिकदृष्ट्या पूर्णपणे खचून गेली होती. त्यानंतर ती पुन्हा मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये परतली व शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

मेडिकव्हर हॉस्पिटलचे कन्सल्टंट ईएनटी आणि एंडोस्कोपिक सर्जन डॉ. राजेंद्र वाघेला सांगतात की, या दोन वर्षात हळूहळू तिची श्रवण क्षमता कमी कमी होत गेली. ओटोस्क्लेरोसिस ही अशी स्थिती आहे जिथे मधल्या कानातील स्टेप्स हाड स्थिर होते आणि आतील कानात आवाज प्रसारित करण्यात अयशस्वी होते. ओटोस्क्लेरोसिस हे भारतात बहिरेपणाचे एक सामान्य कारण आहे, बहिरेपणा आणि कानाचा पडदा अखंड असलेल्या रुग्णांमध्ये असे ९.२% रुग्ण आढळतात.

रुग्णाच्या आईलाही अशीच समस्या होती आणि २ वर्षांपूर्वी मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये तिची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. ओटोस्क्लेरोसिसमध्ये ही एक अनुवांशिक स्थिती असून जर एका पालकाला ओटोस्क्लेरोसिस असेल तर त्यांच्या बाळाला तो होण्याची शक्यता २५% इतकी असते. जर दोन्ही पालकांना ओटोस्क्लेरोसिस असेल तर हा धोका ५०% पर्यंत वाढतो. हार्मोनल बदलामुळे ओटो स्क्लेरोसिस असलेल्या महिलांमध्ये गर्भधारणेमुळे देखील श्रवणशक्ती कमी होऊ शकते.

डॉ. वाघेला पुढे सांगतात की, या शस्त्रक्रियेला स्टेपेडोटोमी असे म्हणतात आणि ती सर्वात नाजूक सूक्ष्म शस्त्रक्रिया पैकी एक आहे. ती या प्रक्रियेसाठी योग्य होती कारण तिची श्रवणशक्ती खुप कमी झाली होती व शस्त्रक्रियेशिवाय पर्याय नव्हता. त्यासाठी स्टेप्स हाडात एक लहानसे छिद्र पाडून केवळ 3.75 मिमी (3.5 ते 5 मिमी पर्यंत) पिस्टन प्रोस्थेसिस बसवणे गरजेचे आहे. खूप लहान आकाराचा पिस्टन श्रवणशक्ती पुनर्संचयित करू शकत नाही, तर खूप लांब असा पिस्टनमुळे चक्कर येऊ शकते. परंतु ही प्रक्रिया अचूकपणे पार पाडल्यास त्याचे परिणाम उत्तम आहेत. रुग्णाच्या श्रवणशक्तीत लक्षणीय सुधारणा झाली आणि तिला आता कोणत्या यंत्राची देखील आवश्यकता भासत नव्हती. ही प्रक्रिया सुमारे एक तास चालली आणि रुग्णाला दुसऱ्याच दिवशी घरी सोडण्यात आले. योग्य वेळी शस्त्रक्रिया न केल्यास श्रवणशक्तीची समस्या आणखी वाढली असती. आज या रुग्णाने श्रवणयंत्रांचा वापर पूर्णपणे बंद केला आहे आणि ती या शस्त्रक्रियेच्या परिणामांमुळे खूप आनंदी आहे.

पूर्वी मला साधे संभाषण ऐकू येत नसल्याने मला अस्वस्थ वाटायचे. बऱ्याचदा मी काही चुकीचे बोलेल की काय याची भीती वाटत होती. मी योग्य वेळी प्रतिसाद न दिल्याने बऱ्याच लोकांना वाटायचे की मी त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत आहे. हळूहळू मी चारचौघात जाणे टाळू लागली. मात्र जेव्हा मी मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉ. राजेंद्र वाघेला यांची भेट घेतली त्यानंतर मात्र माझ्या आयुष्याला खरी कलाटणी मिळाली अशी प्रतिक्रिया रुग्ण दीपिका गाला (नाव बदलले आहे)* यांनी व्यक्त केली.

## संपादकीय

# एका परिवर्तनशील, सहृदय नेतृत्वाचा अमृतमहोत्सव

आज ११ सप्टेंबर. हा दिवस वेगवेगळ्या घटनांशी जोडलेला आहे. एक आठवण १८९३ ची. याच दिवशी स्वामी विवेकानंदांनी शिकागो येथे विश्वबंधुत्वाचा संदेश दिला आणि याच दिवशी विश्वबंधुत्वाला धक्का देणारी घटना घडली – अमेरिकेवर झालेला 'नाइन-इलेव्हन'चा हल्ला. आजच्या दिवसाची आणखी एक खासियत आहे. ज्यांनी 'वसुधैव कुटुंबकम्' या मंत्रावर चालत समाजाला संघटित करण्यासाठी, समता-समरसता आणि बंधुत्वाची भावना बळकट करण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले, असे सरसंघचालक मोहन भागवतजी यांचा आज जन्मदिन आहे. मी भागवतजींना हार्दिक शुभेच्छा देतो. त्यांना दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्य मिळो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना!

माझा भागवतजींच्या कुटुंबाशी प्रदीर्घ संबंध आहे. त्यांचे वडील स्वर्गीय मधुकरराव भागवतजींसोबत काम करण्याचे सौभाग्य मला लाभले. मधुकररावजी आयुष्यभर राष्ट्रनिर्मितीच्या कार्यासाठी समर्पित राहिले. तारुण्यातला बराच काळ त्यांनी गुजरातमध्ये संघकार्याची पायाभरणी केली. आपल्या पुत्रावर तेच समर्पणाचे संस्कार त्यांनी केले.

मोहन भागवतजी १९७० च्या दशकात संघाचे प्रचारक झाले. 'प्रचारक परंपरा' ही संघकार्याची विशेषता. गेल्या १०० वर्षांत देशभक्तीच्या प्रेरणेने भारलेल्या हजारो युवक-युवतींनी आपले घर-परिवार त्यागून संघ परिवाराच्या माध्यमातून आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्राला समर्पित केले आहे. भागवतजी त्या महान परंपरेचे पाईक. आणीबाणीच्या काळात प्रचारक म्हणून भागवतजींनी विरोधी आंदोलनाला सतत बळकटी दिली. त्यांनी अनेक वर्षे महाराष्ट्रातील ग्रामीण आणि मागास भागात, विशेषतः विदर्भात काम केले. १९९० च्या दशकात 'अखिल भारतीय शारीरिक शिक्षण कार्यक्रम प्रमुख' म्हणून त्यांनी केलेल्या कार्याची आजही अनेक स्वयंसेवक आठवण करतात.

२००० साली भागवतजी सरकार्यवाह झाले आणि येथेही भागवतजींनी आपल्या अनोख्या कार्यशैलीचा अमीट ठसा उमटवला. २००९ मध्ये भागवतजी सरसंघचालक झाले आणि आजही अत्यंत ऊर्जा घेऊन कार्यरत आहेत. सरसंघचालक होणे म्हणजे केवळ एक संघटनात्मक जबाबदारी नव्हे. हे एका पवित्र विश्वासाचे बंधन आहे. पिढ्यान् पिढ्या अनेक दूरदर्शी व्यक्तिमत्त्वांनी हा विश्वास बळकट केला.

राष्ट्राच्या नैतिक आणि सांस्कृतिक मार्गाला दिशा दिली. सरसंघचालकपदाची जबाबदारी निभावत असताना भागवतजींनी त्यात आपली वैयक्तिक शक्ती, बुद्धी आणि सहृदय नेतृत्वही जोडले आहे. त्यांनी अधिकाधिक युवकांना संघकार्याकरिता प्रेरित केले. बदलत्या काळाबरोबर बदलण्यासाठी, परिवर्तनासाठी खुल्या मनाने स्वागतशील असणे ही मोहनजींची फार मोठी खासियत आहे.

संघाच्या १०० वर्षांच्या प्रवासात भागवतजींचा कार्यकाळ हा सर्वाधिक परिवर्तनाचा कालखंड मानला जाईल. गणवेश बदल, संघशिक्षा वर्गांमध्ये बदल असे अनेक महत्त्वपूर्ण बदल त्यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. कोरोना काळात त्यांनी संघ स्वयंसेवकांना दिलेली दिशा आणि प्रेरणा सदैव स्मरणात राहील.

समाजकल्याणासाठी संघशक्तीचा सातत्याने उपयोग व्हावा यावर मोहन भागवतजींचा विशेष भर राहिला आहे. यासाठी त्यांनी पंच परिवर्तनाचा मार्ग प्रशस्त केला. यात स्वबोध, सामाजिक समरसता, नागरिक शिष्टाचार, कुटुंब प्रबोधन आणि पर्यावरण या सूत्रांवर राष्ट्रनिर्मितीस प्राधान्य देण्यात आले आहे. प्रत्येक भारतवासीयाला पंच परिवर्तनाच्या या सूत्रांमधून नक्कीच प्रेरणा मिळेल.

मोहनजींच्या स्वभावाची आणखी एक मोठी खासियत म्हणजे ते मृदुभाषी आहेत. दुसऱ्यांचे ऐकून घेण्याची अद्भुत क्षमता त्यांच्यात आहे. ते नेहमीच 'एक भारत श्रेष्ठ भारत'चे प्रबळ समर्थक राहिले आहेत. भारताची विविधता आणि भारतभूमीची शोभा वाढवणाऱ्या अनेक संस्कृती व परंपरांच्या उत्सवात ते संपूर्ण उत्साहाने सहभागी होतात. ते आपल्या व्यस्ततेतून वेळ काढून संगीत आणि गायन यात रस घेतात, विविध भारतीय वाद्ये वाजविण्यातही ते प्रवीण आहेत, हे फार कमी लोकांना माहिती असेल.

स्वच्छ भारत, बेटी बचाओ बेटी पढाओ यासारख्या प्रत्येक जन आंदोलनांमध्ये मोहन भागवतजींनी सहभाग घेतला आणि संपूर्ण संघ परिवाराला या आंदोलनांमध्ये ऊर्जा भरण्यासाठी प्रेरित केले. पर्यावरणाशी निगडित प्रयत्न आणि शाश्वत जीवनशैलीप्रतीचे त्यांचे समर्पण मी जाणतो. आत्मनिर्भर भारतावरदेखील मोहनजींचा फार मोठा भर आहे. येत्या विजयादशमीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ १०० वर्षांचा होईल. विजयादशमीचा उत्सव, गांधी जयंती, लाल बहादूर शास्त्री यांची जयंती आणि संघाचे शताब्दी वर्ष हे सारे एकाच दिवशी येत आहेत, हाही एक सुखद योगायोगच म्हटला पाहिजे.

भारत आणि जगभरातील लाखो स्वयंसेवकांसाठी हा एक ऐतिहासिक प्रसंग आहे. आम्ही स्वयंसेवक भाग्यवान आहोत की आमच्याकडे मोहन भागवतजींसारखे दूरदर्शी आणि परिश्रमी सरसंघचालक आहेत. एका तरुण स्वयंसेवकापासून सरसंघचालकापर्यंतचा त्यांचा जीवनप्रवास त्यांच्या निष्ठा आणि वैचारिक दृढतेचे दर्शन घडवतो. विचाराप्रती पूर्ण समर्पण आणि व्यवस्थांमध्ये समयानुकूल बदल करत त्यांच्या नेतृत्वाखाली संघकार्याचा सातत्याने विस्तार होत आहे.

# केबीसी मध्ये चंद्रकांत घाटाळ यांना संधी मिळणार ?

### दहा वर्षात दहा हजारापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना मोफत लाभ, एक लाख विद्यार्थ्यांसाठीचा टार्गेट

महाराष्ट्र जीत

**भिवंडी (सुनील झळके)**

आपल्या अनेक प्रकारच्या समाजामध्ये साधी राहणी आणि उच्च विचारसरणी अशा पद्धतीने नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या विविध व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यासाठी आदित्य बिर्ला ग्रुप व केबीसी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या Force for Good Hero's या उपक्रमात पालघर जिल्ह्याचा अभिमान असलेले आदिवासी समाजातील खगोल अभ्यासक व लेखक श्री. चंद्रकांत घाटाळ यांच्या सामाजिक व वैज्ञानिक कार्याची दखल घेण्यात




आली आहे.

त्यांच्या "अनुजा अवकाश निरीक्षण केंद्र, कासा" या केंद्रामार्फत ग्रामीण भागातील मुलांना खगोलीय विज्ञानाची माहिती व प्रशिक्षण विनामूल्य उपलब्ध करून दिले जाते. हे निस्वार्थी कार्य ते सातत्याने करीत आहेत, हीच त्यांची समाजाप्रती व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिकदृष्ट्या उल्लेखनीय कामगिरी ठरलेली आहे आणि साधी राहणी आणि उच्च विचारसरणी ही त्यांची विशेष खासियत आहे. त्यांच्या याच उल्लेखनीय कार्याच्या जोरावर त्यांची फोर्स फॉर गुड हिरोज या उपक्रमात त्यांची नोंदणी झाली आहे. या नोंदणीचा अधिकृत इमेल कंपनीकडून पाठवण्यात आला आहे. यात प्रमाणपत्रासह त्यांचा नोंदणी क्रमांक आहे. यात अनुजा अवकाश निरीक्षण केंद्र कासाचे संचालक म्हणून चंद्रकांत घाटाळ यांच्या नावाची नोंद घेण्यात आली आहे.या उपक्रमाअंतर्गत बऱ्याच सामाजिक संस्थांची नोंदणी असून,त्यातील काही संस्थांची निवड कार्यक्रमासाठी होणार आहे. यात घाटाळ यांच्या केंद्राची निवड होईल असा विश्वास घाटाळ यांनी व्यक्त करीत, भविष्यामध्ये एक लाख विद्यार्थ्यांना या अवकाश निरीक्षण केंद्राचा फायदा देण्याचं टार्गेट ठेवून कार्यरत राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# कु. पूजा पुरूषोत्तम डिक्कर आविष्कार स्पर्धेत तिसरी

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत प्रतिनिधी प्रदीप पोटफोडे**

**विहामांडवा:** आर.वाय.पी.कला महाविद्यालयाची कु.पूजा पुरूषोत्तम डिक्कर ही विद्यार्थीनी मानव्यविद्या शाखा, भाषाविभाग व ललित कला या विभागांतर्गत दि.10 सप्टे.2025 रोजी झालेल्या जिल्हास्तरीय महाविद्यालयीन आविष्कार या स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकाविला या बद्दल बादशाह अंजुमन शिक्षण संस्था व सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. बादशाह अंजुमन ईशाते ई तालिम शिक्षण संस्थेच्या आर.वाय. पी.कला महाविद्यालयातील कु. पूजा पुरूषोत्तम डिक्कर ही विद्यार्थीनी अतिशय होतकरू व आदर्श गुणवंत विद्यार्थीनी आहे. महाविद्यालयात प्रथम वर्षात गुणानुक्रमे प्रथम आली. करिअर कट्टा अंतर्गत उपक्रमामध्ये करिअर संसदेची महिला व बाल विकास मंत्री आहे. क्रीडा विभागाच्या विविध स्पर्धेत प्राविण्य मिळवते. मराठी वाड्मय अभ्यास मंडळाची अध्यक्ष प्रतिनिधी, तसेचे महाविद्यालयीन महिला तक्रार निवारण समितीत सदस्य आहे. अशा विविध क्षेत्रात काम करणारी ही विद्यार्थीनी निश्चितच भविष्यात मोठे यश मिळवेल अशी खात्री वाटते. जिल्हास्तरीय आविषकार या स्पर्धेत महाविद्यालयाच्या वतीने कु.रूबिना शेख, कु.अश्विनी बढे, कु.पूजा डिक्कर ,कु. प्राची बनसोडे, कु. निकिता रोडगे, कु.मानसी जयस्वाल,कु.श्वेता गंगथीरे, कु.प्रिया दळवी,कु.माया दळवे या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. पैकी कु.पूजा डिक्कर ही आविष्कार महाविद्यालयीन जिल्हास्तरीय स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकाविला असून विद्यापीठीय केंद्रीय स्पर्धेत तिची निवड झाली आहे. याकरिता महाविद्यालयीन आविष्कार समन्वयक प्रा.डॉ. संजय शिंदे यांचे मार्गदर्शन मिळाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर गीरे यांचे सहकार्य लाभले, तसेच महाविद्यालयातील क्रीडा संचालक प्रा.डॉ. अजय बडे , प्रा.विकास बेळगे, प्रा.दत्ता साबळे, प्रा,डॉ. चंद्रकांत जोगदंड , श्री गणेश करंगळ, श्री दिनेस ससाणे, श्री फेरोज सय्यद, शरीफ शेख,ओम नवपुते, फारूख सय्यद , तसेच विद्यार्थी जिजा कनके, सौरभ कनके व पालकांनी या यशाबद्दल सर्व सहभागी विद्यार्थीनींसह व मार्गदर्शक आविष्कार समन्वयकाचे अभिनंदन केले आहे.




# देवळाली धोंडीरोड रस्त्यासाठी आता थेट जिल्हाधिकारींना साकडे

### धोंडीरोड मार्ग बनला अपघाताचा मार्ग

## शिवसेनेच्या वतीने जिल्हाअधिकारींना निवेदन

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्पः- ( प्रतिनिधी) गोकुळ लोखंडे**

येथील देवळाली कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीतील श्री खंडेराव महाराज टेकडी – धोंडीरोड ते बार्नस्कुल या मुख्य रस्त्यासाठी आता थेट जिल्हाअधिकारी यांना निवेदन सादर करून लक्ष घालण्याची विनंती शिवसेना ठाकरे गटाचे नेते प्रमोद मोजाड यांच्या वतीने निवेदन देऊन करण्यांत आली आहेत.गेल्या सात महिन्यांभरापूर्वीच येथील देवळाली कॅन्टोनमेन्ट बोर्ड हद्दीतील देवळाली कॅम्प ते धोंडीरोड मार्ग बार्नस्कुल हा मुख्य मार्ग रस्ता हा दिवसेंदिवस मुत्युचा सापळा बनत चालला असून.या रस्त्याची जबाबदारी नक्की कोणाची आहेत.या आशयाचे निवेदन देवळाली कॅन्टोनमेन्ट मुख्यकार्यकारी अधिकारींसह जिल्हाधिकारी कार्यालयास शिवसेनाच्या वतीने सादर करण्यांत आले होते.कॅन्टोनमेंन्ट बोर्डाने हा संबंधित रस्ता कॅन्टोनमेन्टचा नसुन लष्कराचा असल्याचे सांगुन हात वर केले..आता या रस्त्यांची जबाबदारी कोणी घ्यायची असा प्रश्न सर्व सामान्य नागरिकांना पडला आहेत. आज या मार्गावर सहा शाळा आहेत. तसेच लष्कराचे सराव प्रशिक्षण केंद्रासह लष्कराचे महत्वाचे युनिट देखील याच मार्गावर आहेत.व बारा हजारांहून लोकसंख्या असलेले शिगवे बहुला गाव देखील याच मार्गावर आहेत. त्यात हा मार्ग अरुंद आहेत. या रस्त्यांची अतिशय दैनिय दुरावस्था झालेली आहेत.शहरातील हा मार्ग सर्वात जास्त महत्वाचा मानला जातो.या मार्गावरून लष्करी प्रशिक्षण तोफा-रणगाडे , व लष्कराची मोठी मोठी वाहने ,शालेय विद्यार्थ्यांची बस,रिक्षा ,व्हॅन, तसेच दुचाकी , सायकल यांसह पायी शाळेतील विद्यार्थी अशी मोठ्याप्रणावर वर्दळ असते. आज शालेय विद्यार्थ्यांसह पालकांना व वाहन चालकांना जिव मुठीत घालुन प्रवास करावा लागतोय.याच मार्गावर दिवसेंदिवस दिवस अपघाताचे प्रमाण देखील सर्वाधिक वाढत चालले आहेत.या मार्गावर असलेली सेंट पॅट्रीक स्कुल,देवळाली हायस्कूल,इंग्लिश प्रेप स्कुल,सरवस्ती विद्या मंदिर,पोतदार स्कुल, बार्नस्कुल, जि.प.शाळा शिंगवे बहुला अशा शाळा आहेत. या सर्व शाळांची शालेय विदयार्थी यांची वेळ व लष्करी प्रशिक्षणांसाठी जाणारे जवान सैनिक यांची वेळ हि एकच असते या सर्व शाळा एकाच वेळी भरता व सुटतात तसेच येथील .त्यामुळे हा मार्ग सर्वात जास्त मोठ्याप्रणावर चालु असतो.अशा परिस्थितीत या मार्गावर अनेक अतिक्रमण देखील झालेले आहेत. हा रस्ता मोठ्याप्रणावर रुंदीकरण होणे गरजेचे असून आपण याची दखल घेऊन येथील मार्गाला गती देण्यांत यावीत व येथील संपूर्ण रस्ता लवकरात लवकर दुरुस्ती करण्यात यावा अशी मागणी जिल्हाअधिकारी यांना निवेदन व्दारे करण्यांत आली असुन.यावर काय कार्यवाही होती याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहेत.

# महाविकास आघाडीचा सरकारला इशारा,

### जोपर्यंत विधेयक मागे घेत नाही,तोपर्यंत आंदोलन.

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत : दयानंद शिंदे**

जव्हार तालुक्यात महाविकास आघाडीच्या वतीने जनसुरक्षा विधेयकाविरोधात जोरदार निषेध आंदोलन करण्यात आले. सरकारने आणलेले हे विधेयक सामान्य नागरिकांच्या हक्कांवर गदा आणणारे असून, ते तात्काळ मागे घ्यावे अशी मागणी आंदोलनात करण्यात आली. या आंदोलनामुळे राजकिय वातावरणात ठिणगी पडली असून आंदोलन आणखीनच तीव्र होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या आंदोलनात विक्रमगड विधान सभेचे माजी आमदार सुनील चंद्रकांत भुसारा, राष्ट्रीय काँग्रेस आदिवासी आघाडीचे माजी प्रदेशाध्यक्ष बळवंत गवित, तालुका अध्यक्ष संपत पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे तालुका अध्यक्ष संदीप माळी, शिवसेना (उ.बा.ठा.) नेते हर्षद कोतवाल, कष्टकरी संघटनेचे नेते अजय भोईर, तसेच जव्हार नगरपरिषदचे माजी नगराध्यक्ष रियाज मणियार यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. सभेत बोलताना नेत्यांनी सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले – "जोपर्यंत हे विधेयक मागे घेतले जात नाही, तोपर्यंत आम्ही गप्प बसणार नाही. आंदोलन आणखी तीव्र केले जाईल." आंदोलनावेळी नागरिकांनी घोषणाबाजी करत सरकारविरोधात संताप व्यक्त केला. "जनसुरक्षा विधेयक मागे घ्या", "लोकशाहीचा गळा घोटणारे विधेयक आम्हाला मान्य नाही" अशा घोषणा देण्यात आल्या.




# न.प.माजी उपाध्यक्ष शकील शेख यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

महाराष्ट्र जीत



**कारंजा :** शहरातील जेष्ठ पत्रकार सत्य आणि न्यायासाठी नेहमीच खंबीरपणे पत्रकारिता करणारे, जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी तळमळीने लिखाण करुन गरजु लोकांच्या मनात घर निर्माण करणारे, तसेच जनतेने सुध्दा त्याच्या कार्याची पावती म्हणून त्यांना कारंजा नगरपरिषदेच्या निवडणुकीत भरगच्च मताधिक्याने निवडुन दिले,नगरसेवक बनविले नंतर त्यांना कारंजा नगरपरिषदेच्या उपाध्यक्ष बनविले, सामान्य नागरिकांच्या काळजात राहणारे पत्रकार तथा नगर परिषदचे माजी उपाध्यक्ष शकील शेख यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी समाजसेवक अब्दुल वहिद शेख लाल,निसार पंजाब माजी नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते अफजल खान,अतुल उर्फ अत्ताउल्लाह भाई,नाजीम कुरेशी,शेख सलीम सदर,सलीम खान,कौसर पहेलवान, पत्रकार सैय्यद इर्शाद,कादर अहेमद खान,कुद्दुस भाई,समीर भाई उर्फ शम्या भाई,सलीम भाई, इंजिनिअर फरदीन खान, पत्रकार हाफीज शेख,पत्रकार सैय्यद आसिफ,यांच्या सह शेकडो वहीद भाई मित्र परिवारातील सदस्य उपस्थित राहुन पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी शकील खान यांच्या पत्रकारितेतील योगदानाचे, तसेच सामाजिक कार्याचे विशेष कौतुक केले. समाजातील सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना आवाज देत प्रामाणिक आणि निडरपणे पत्रकारिता करणारे शकील शेख हे नव्या पिढीतील पत्रकारांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. वाढदिवसाचा कार्यक्रम अब्दुल वहीद भाई यांचे संपर्क कार्यालय, शिवाजी नगर कारंजा लाड येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या शेवटी शकील शेख यांनी शुभेच्छा देणाऱ्या सर्वांचा मनःपूर्वक आभार मानले.

# स्व. निर्धन पाटील वाघाये महाविद्यालयात 'वेब डेव्हलपमेंटसह आयटीमध्ये करिअर' विषयावर सेमिनार संपन्न.

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत / हंसराज भंडारा.**

**लाखनी:** स्व. निर्धन पाटील वाघाये महाविद्यालय, लाखनी येथे संगणक आणि बॉटनी विभागाच्या संयुक्त विद्यमाने "वेब डेव्हलपमेंटसह आयटीमध्ये करिअर" या महत्त्वपूर्ण विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून भंडारा येथील सुप्रसिद्ध सॉफ्टवेअर इंजिनीअर भंडारा दुर्गेश खोट, वैद्य , महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. गणेश कापसे आणि रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुधाकर शेंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सेमिनारमध्ये, दुर्गेश खोट यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे वेब डेव्हलपमेंटसह आयटी क्षेत्रात करिअर करण्याच्या संधींबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आयटी सेक्टरमधील विविध सॉफ्टवेअर सर्टिफिकेट कोर्सेस, त्यातून उपलब्ध होणाऱ्या नोकरीच्या संधी आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS), इन्फोसिस, एचसीएल टेक्नॉलॉजीज, विप्रो, टेक महिंद्रा, LTIMindtree, अमेझॉन यांसारख्या नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या कोर्सेसची माहिती दिली. विशेष म्हणजे, हे सर्व कोर्सेस त्यांच्याकडे ऑनलाईन उपलब्ध असून, त्यासाठी पुणे, मुंबई, नागपूर किंवा हैदराबाद येथे क्लासेस लावण्याची गरज नाही, तर भंडाऱ्यामध्येच ऑनलाईन क्लासेस उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. आयटी आणि कम्प्युटर सायन्सच्या विद्यार्थ्यांनी हे कोर्सेस



करून आयटी सेक्टरमध्ये आपले करिअर कसे घडवू शकतात, यावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात, प्राचार्य डॉ. गणेश कापसे यांनी आयटी सेक्टरमध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर नोकरीच्या संधी उपलब्ध असल्याचे नमूद केले. आज प्रत्येक क्षेत्रात कम्प्युटरचा वापर केला जात असल्यामुळे अधिकाधिक विद्यार्थ्यांनी आयटी क्षेत्राकडे आपले करिअर घडवावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. श्रद्धा बोरकर यांनी केले, तर प्रास्ताविक गणित विभाग प्रमुख प्रा. तुषार डोंगरवार यांनी सादर केले. आभार प्रदर्शन बॉटनी विभाग प्रमुख डॉ. मंगेश वंजारी यांनी केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वंदे मातरम या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# कोकलगाव जिल्हा परिषद शाळेत नव्याने रुजू झालेले शिक्षक यांचा सत्कार.

महाराष्ट्र जीत

**वाशिम ( प्रतिनिधी)** शिक्षण विभागाच्या वतीने गेल्या अनेक दिवसापासून शिक्षकांच्या बदलीची प्रतीक्षा होती ती प्रतीक्षा अखेर दिनांक 9 सप्टेंबर रोजी संपलेली आहे. वाशिम तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या इतरत्र ठिकाणी बदल्या झालेल्या आहेत.त्याच अनुषंगाने तोंडगाव येथून ज्येष्ठ शिक्षक रामदास गोटे व केकतउमरा जिल्हा परिषद शाळा येथून सुरेश गोटे यांची कोकलगाव येथे बदली झालेली आहे. 10 सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद शाळा येथे नव्याने रुजू झालेले शिक्षक सुरेश निंबाजी गोटे व रामदास उद्धवराव गोटे यांचा शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच सामाजिक कार्यकर्ते प्रवीण पट्टेबहादूर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी बोलत असताना नव्याने रुजू झालेले शिक्षक रामदास गोटे यांनी सांगितले की,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण



विकासाला प्राधान्य देऊन विद्यार्थ्यांना योग्य ते शिक्षण देऊन त्यांचा सर्वांगीण विकास करण्यावर भर राहणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.यावेळी कार्यक्रमाला शिक्षक वसावे सर,यांच्यासह येथील शिक्षक उपस्थित होते.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

१ २ ३ ४ ५ ६

## 21 सप्टेंबर रोजी रवींद्र नाट्य मंदिरात राज्यस्तरीय सांस्कृतिक मेळावा; ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांची लाभणार प्रमुख उपस्थिती.






**मुंबई (शांताराम गुडेकर)** महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि लोककलेला प्रोत्साहन देण्यासाठी शरद प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान २०२४ यांच्या वतीने रविवार, २१ सप्टेंबर रोजी रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे भव्य महाराष्ट्र राज्यस्तरीय कलावंत मेळावा आयोजित करण्यात आला आहे. देशाचे नेते, माजी संरक्षण व कृषी मंत्री, भारत सरकार माननीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या उपस्थितीत हा सोहळा रंगणार आहे. महाराष्ट्रभरातून विविध कलाक्षेत्रातील नामवंत व नवोदित कलावंत, संगीतज्ञ, नर्तक, कलाकार, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर एकत्र येणार आहेत.सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माननीय शरदचंद्रजी पवार, सौ. प्रतिभाताई पवार , कलावंतांच्या आधारस्तंभ सुप्रियाताई सुळे , शिवसेना नेते, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, , युवा आमदार पवार, संसदरत्न खासदार डॉ अमोल कोल्हे, शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे, अभिनेते किरण माने यांच्यासह अनेक मंत्री, खासदार, आमदार व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कलावंत मेळाव्यात कार्यक्रमात गणेश पूजन, सरस्वती पूजन आणि महामानव पूजन, महाराष्ट्रातील नामवंत कलावंतांचे सादरीकरण, भजन, गोंधळ, दशावतार, पोवाडे, लावणी, वाघ्या मुरळी, आदिवासी नृत्य, कोळीनृत्य यांसारखे रंगतदार कार्यक्रम, मान्यवरांचे मार्गदर्शनपर व भाषण, संस्थेच्या कार्याचा आढावा आणि कलावंतांचा गौरव सोहळा होणार आहे. महाराष्ट्राची परंपरा आणि लोककला जपणे, कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि नव्या पिढीला सांस्कृतिक वारसा समजावून सांगणे महाराष्ट्राच्या कलावंतांसाठी हा कार्यक्रम एक ऐतिहासिक पर्व ठरणार आहे. सर्व रसिक, कलाकार आणि सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजक अध्यक्ष शरदचंद्र प्रतिभाशाली सांस्कृतिक प्रतिष्ठान,महाराष्ट्र राजाराम बुवा शेलार यांनी केले आहे.

## राज्य व जिल्हास्तरीय जागतिक कौशल्य स्पर्धा

### 23 वर्षाखालील पात्र उमेदवारांनी 30 सप्टेंबरपर्यंत नावनोंदणी करण्याचे आवाहन

महाराष्ट्र जीत **नांदेड जिल्हा प्रतिनिधी**

जागतिक कौशल्य स्पर्धा दर दोन वर्षांनी होते. ही जगातील सर्वात मोठी व्यवसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा आहे. जगभरातील 23 वर्षाखालील तरूणांसाठी कौशल्य सादर करण्याची ही स्पर्धा ऑलिम्पिक खेळासारखी आहे. ही स्पर्धा 2026 मध्ये शांघाई येथे आयोजित केली जाणार आहे. या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील 23 वर्षाखालील पात्र उमेदवारांनी HTTPS://WWW.SKILLINDIADIGITAL.GOV.IN या लिंकवर भेट देऊन 30 सप्टेंबरपर्यंत नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे, सहायक आयुक्त, डॉ.राजपाल कोल्हे यांनी केले आहे. त्याअनुषंगाने 2026 मध्ये आयोजित केलेल्या जागतिक स्तरावरील कौशल्य स्पर्धेच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने 63 क्षेत्राशी संबंधित जिल्हा व राज्यस्तरावर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय सेक्टर स्किल कौन्सिल विविध औद्योगिक आस्थापना यांच्या सहकार्याने कौशल्य स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे आयोजन जिल्हा, विभाग, राज्य आणि देशपातळीवर करून निवड केलेल्या उमेदवारांची नावे पुढील जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येतील. शांघाई येथे आयोजित जागतिक कौशल्य स्पर्धा 2026 जिल्हा, विभाग, राज्य, देशपातळीवरून प्रतिभासंपन्न कुशल उमेदवारांचे नामांकन करण्याच्या दृष्टीने आयोजित स्पर्धेसाठी सर्व आयटीआयएस, पॉलिटेक्निक, एमएसएमई टुल्स रूम्स, सीआयपीईटी, आयआयटी, अभियांत्रिकी महाविद्यालय, आयएचएम/ हॉस्पिटॅलिटी संस्था, कॉर्पोरेट तंत्र संस्था, कौशल्य प्रशिक्षण संस्था, महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, एमएसबी व्हीईटी, खाजगी कौशल्य विद्यापीठ, ललित कला महाविद्यालये, फ्लॉवर प्रशिक्षण संस्था, ज्वेलरी मेकिंग संस्था, शिक्षण संस्था तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अधिनस्त सर्व व्यवसाय प्रशिक्षण संस्था यांना या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी निवेदन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. जागतिक कौशल्य स्पर्धा 2026 साठी वयोमर्यादा हा एकमेव निकष ठरविण्यात आला आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी 50 क्षेत्रांकरीता उमेदवाराचा जन्म 01 जानेवारी 2004 किंवा तद्नंतरचा असणे अनिवार्य आहे. या क्षेत्राची माहिती HTTPS://WWW.SKILLINDIADIGITAL.GOV.IN या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## विद्यार्थ्यांनी शिक्षणा सोबत विशिष्ट कलाअंगी जोपासावी – गणेशप्रसाद गावंड



**उरण दि १०(विठ्ठल ममताबादे )** शिक्षण प्रेमी कै. विठाबाई शिवराम म्हात्रे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व सांस्कृतिक वारसा जपणारे कलाकार यांचा विशेष गुणगौरव कार्यक्रम आवरे गावातील प्रसिद्ध अंनतभूवन सभागृहात पार पडला. उत्कृष्ट कलाकार सम्राट नित्यानंद म्हात्रे यांनी सी बी एस सी परीक्षेत विशेष नैपुण्य मिळवल्याबद्दल तसेच कौस्तुभ आल्हाद म्हात्रे यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत रायगड जिल्ह्यात सतरावा क्रमांक मिळवल्याबद्दल या दोन्ही गुणवंतांचा सत्कार उपस्थित मान्यवर यांच्या शुभ हस्ते मायेची उबदार शाल सन्मान चिन्ह व श्रीफळ देऊन करण्यात आला. तसेच आवरे गावातील सांस्कृतिक वारसा जपणारे कलाकार यांचा विशेष गौरव कारण्यात आला या प्रसंगी गणेशप्रसाद गावंड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत कुठल्याही प्रकारची कला आपल्या सोबत जोपासावी व प्रगती करावी.सत्कारमूर्ती सम्राट नित्यानंद म्हात्रे याने आपले मनोगत व्यक्त करत आपल्याला भविष्यात शास्त्रज्ञ या क्षेत्रात काम करायचं आहे असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष रायगड भूषण संगीत विशारद शिवभक्त गणेश प्रसाद गावंड हे होते.यावेळी प्रभाकर म्हात्रे,एच के गावंड, प्रभाकर गावंड, पद्माकर म्हात्रे,महेश म्हात्रे, डी ए गावंड, देविदास म्हात्रे, प्रियांका म्हात्रे,जगदीश गावंड, विलास म्हात्रे, संजय गावंड,पद्माकर म्हात्रे आदी मान्यवर होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक एम एस म्हात्रे यांनी तसेच स्वागत गीत नरेश गावंड व आभार प्रदर्शन डी ए गावंड यांनी केले.या कार्यक्रमाचे आयोजन सेवानिवृत्त आदर्श शिक्षक व केंद्रप्रमुख एम एस म्हात्रे यांनी केले. कार्यक्रम प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर व आवरे ग्रामस्थ, विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते.

## डोंगर,माळरान वर निर्माण झालेले गवत बनत आहे रोजगाराचे साधन

महाराष्ट्र जीत **प्रतिनिधी**
**पाताळगंगा : १० सप्टेंबर**

आदिवासी बांधवांच्या हाताला कोठेच काम मिळेनासे झाले की, पावसाळ्यात निर्माण झालेले गवत आदिवासी यांना रोजगार मिळून देत आहे.ग्रामीण भागात शेतजमीन शिवाय बराचसा भाग ओसाड असतो. याच ओसाड जमिनीवर उगवणारे गवत कापून ते विक्री करुन रोजगार उपलब्ध होत असल्याचे चित्र सध्या तालुक्याच्या ठिकाणी पहावयास मिळत आहे.

दर वर्षी पावसाळ्यामुळे तयार होणा-या गवतामुळे आदिवासी यांना रोजगारांचा प्रश्न सुटत असतो.सध्या गवताला मोठी मागणी असल्यामुळे रस्त्याच्या बाजूला निर्माण झालेले गवत आदिवासी कापून त्याची विक्री करीत आहे.शहरातील मोठे तबेलेवाले व इतर व्यक्ती मोठय़ा प्रमाणात गवता ची खरेदी करत असून यातून त्यांचा उदरनिर्वाह होत आहे.

आदिवासी समाज हा दुर्गम अशा डोंगराळ भागामध्ये राहत असतो.मात्र पावसाळ्यात या माळरान अथवा डोंगराळ भागात मोठ्याप्रमाणावर गवत निर्माण होत असते.त्याच बरोबर ज्या शेतामध्ये लागवड केली नाही त्या ठिकाणी सुद्धा गवत निर्माण होत असते.यांची विक्री करून घरचे भागवणे सोपे जात आहे.असे मत आदिवासी बांधव यांनी व्यक्त केले.



## समुद्री निगम परियोजनाओं के लिए परमिट हेतु विभिन्न विभागों के साथ समन्वय – मत्स्य पालन और बंदरगाह मंत्री नितेश राणे

**मुंबई:** मत्स्य पालन और बंदरगाह मंत्री नितेश राणे ने महाराष्ट्र समुद्री निगम की विभिन्न परियोजनाओं के लिए पर्यावरण, वन सहित विभिन्न विभागों से अनुमति प्राप्त करने के लिए सभी संबंधित विभागों के साथ समन्वय करने का निर्देश दिया है। मत्स्य पालन मंत्री नितेश राणे ने मंत्रालय में महाराष्ट्र समुद्री निगम के विभिन्न मुद्दों की समीक्षा की। मत्स्य पालन मंत्री राणे ने कहा कि मैरीटाइम कॉर्पोरेशन परिसर में स्थित स्टॉल्स का किराया तुरंत तय करने की कार्रवाई की जाए। होर्डिंग्स लगाने के काम में तेज़ी लाई जाए। नवंबर तक सभी नियोजित होर्डिंग्स लगा दिए जाएँ। राणे ने यह भी निर्देश दिया कि इन सभी परियोजनाओं के लिए आवश्यक परमिट के लिए पर्यावरण विभाग के साथ समन्वय बनाए रखा जाए।



## .आय.एम.सी.लि. जेएनपीटी, न्हावा शेवा येथे कामगारांच्या वेतनवाढीचा करार संपन्न.

### कोकण श्रमिक संघाच्या माध्यमातून कामगारांना मिळाला न्याय.

**उरण दि १०(विठ्ठल ममताबादे )** मे.आय.एम.सी.लि., जेएनपीटी, न्हावा शेवा, ता.उरण, जि. रायगड मधील कामगारांच्या वेतनवाढीचा करार शनिवार दि.०६/०९/२०२५ रोजी संपन्न झाला. सदर कंपनी वेगवेगळ्या प्रकारची रसायने, खाद्यतेले याचा मोठमोठ्या टाक्यांमध्ये साठा करीत असते. आवश्यकतेनुसार ग्राहक आपला माल घेऊन जात असतो. यामधून कंपनीला भाडे पोटी मोठा नफा होत असतो. सदर कंपनी मध्ये कोकण श्रमिक संघ ही मान्यता प्राप्त युनियन आहे. कामगारांच्या वेतनवाढीचा मागील करार संपुष्टात आल्यानंतर वेतनवाढीबाबत मागणी पत्र कंपनीला देण्यात आले. नवीन वेतनवाढीचा करारनामाबाबत कामगार नेत्या जनरल सेक्रेटरी ऍड.श्रुती शाम म्हात्रे, सेक्रेटरी-एकनाथ ठोंबरे, स्थानिक युनिट अध्यक्ष रविंद्र भोईर, धर्मेंद्र ठाकुर,रविंद्र ठाकूर, किरण घरत कामगार कमिटी व कंपनीचे अधिकारी हरेष सविता, व्हॉइस प्रेसिडंट सरतेज यादव, जनरल मॅनेजर, नवलेश कुमार रिजनल हेड,नेहरु सुब्रम्हण्यम सि. मॅनेजर फायनसस, जी. के. श्रीधरन, आय. आर. यांनी वारंवार चर्चा केल्या. चर्चे अंती एकमत झाल्यानंतर दि.०६/०९/२०२५ रोजी सदर वेतनवाढीच्या करारनाम्यावर सह्या करण्यात आल्या. कंपनीसोबत सलग हा चौथा करार करण्यात संघटनेला यश आले आहे. पाच वर्षे कालावधी करीता कामगारांना एकूण रुपये २१०००/- पगार वाढीचा करार करण्यात संघटना यशस्वी झाली. जेएनपी एरियामध्ये आजपर्यंतची हि सर्वात मोठी पगारवाढ कामगारनेत्या डॉ. श्रुती म्हात्रे याच्या नेतृत्वाखाली झाली आहे. कामगारांनी जल्लोशात श्रुती म्हात्रे यांचे अभिनंदन केले. खऱ्या अर्थाने गणपती बाप्पाने विसर्जना दिवशी कामगारांना मोठी भेट दिली आहे. यामुळे कामगारांमध्ये मोठया प्रमाणात उत्साह पसरला असून कामगारांनी पेढे भरवून आनंद साजरा केला. सदर वेतनवाढीपोटी कामगारांना मुळ पगार, पर्सनल पे, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, धुलाई भत्ता, शैक्षणिक भत्ता याचे फायदे कामगारांना मिळणार आहेत. त्याचबरोबर कुटुंबाकरीता तीन लाखापर्यंत मेडिक्लेम पॉलिसीचे फायदे, रुपये एक लाख रक्कमेचा वैयक्तिक अपघाती विमा याचे फायदे कामगारांना मिळणार आहेत. सदर करारनाम्यामधील कामगारांमध्ये प्रचंड आनंदाचे वातावरण



तयार झालेले आहे

## मॉरीशस के प्रधानमंत्री डॉ. नवीन चंद्र रामगुलाम मुंबई से रवाना हुए



**मुंबई:** मॉरीशस के प्रधानमंत्री डॉ. नवीन चंद्र रामगुलाम अपने प्रतिनिधिमंडल के साथ शाम 4 बजे छत्रपति शिवाजी महाराज अंतर्राष्ट्रीय हवाई अड्डे से विमान द्वारा रवाना हुए। इस अवसर पर कौशल विकास मंत्री मंगलप्रभात लोढ़ा, अतिरिक्त मुख्य सचिव एवं मुख्य प्रोटोकॉल अधिकारी मनीषा म्हैसकर-पाटणकर, मॉरीशस में भारत के उच्चायुक्त अनुराग श्रीवास्तव, अतिरिक्त पुलिस आयुक्त परमजीत सिंह दहिया, विदेश मंत्रालय, भारत सरकार के निदेशक वरुण जेफ और मुंबई उपनगर के जिलाधिकारी सौरभ कटियार उपस्थित थे। वे अगले कार्यक्रम के लिए वाराणसी रवाना हो गए।

## बाम्हणी येथील शाळेकरी विद्यार्थ्यांची ब्रम्हपुरी आगारावर धडक

आज नागभीड तालुक्यातील बाम्हणी येथील संतप्त नागरिक व शाळेकरी विद्यार्थ्यांच्या मार्फत रस्त्यावर उतरून बस थांबविण्यासाठी आंदोलन केले. नागभीड वरुन ६ कि.मी असलेला नागपुर हायवेवर बाम्हणी वासीयांनी खासदार महोदयांना पत्र देवून गडचिरोली-ब्रम्हपुरी आगारातील बसेसचा थांबा मंजुर करण्यात आलेला होता.

परंतु चालक वाहक वारंवार सुचना देवुन सुध्दा बाम्हणी येथे साधारण, व जलद बसेस थांबवित नव्हते. त्यामुळे आज बाम्हणी येथील संतप्त नागरिक व नागभीडला शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून बसेस थांबविण्यात आले. तसेच यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीचे महासचिव डॉं. सतिशभाऊ वारजूकर, यांनी बाम्हणी येथे भेट देवून त्यांचे मार्गदर्शनात ब्रम्हपुरी आगार येथे जावुन आगारप्रमुखाला निवेदन दिले. व आगार प्रमुख यांनी मागण्याची पुर्तता केली. यावेळी नागभीड तालुका काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष प्रमोदजी चौधरी, काँग्रेस नेते अम्रुत शेंडे, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस सहसचिव अमोल वानखेडे,संजय माकोडे, हरीष मुळे, चेतन भोयर,नितेश ठाकरे, विजय शेंडे, विद्यार्थी आशिष नरुले,विद्या शेंडे,सुचिता घ्यार,श्रद्धा भोयर,यश गायकवाड व बाम्हणी येथील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.




## नक्षलवादी ठरवत भंडारा पोलिसांकडून विद्यार्थ्यांचा छळ: AISF चा तीव्र निषेध, आंदोलनाचा इशारा.

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत / हंसराज भंडारा.**

**मोहाडी** , :- भंडारा जिल्हा पोलिसांच्या अँटी नक्षलस्कॉडने ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन (AISF) या प्रतिष्ठित विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांना नक्षलवादी ठरवून त्यांचा छळ केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, AISF महाराष्ट्र राज्य कौन्सिलने याचा कडाडून निषेध करत संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

**काय घडले?**

दिनांक ८ सप्टेंबर रोजी रात्री, भंडारा पोलिसांच्या अँटी नक्षलस्कॉडमधील संदीप रहांगडाले यांनी AISF च्या सदस्यांची वैयक्तिक माहिती मागितली. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाचे कोणतेही अधिकृत पत्र नसल्याने माहिती देण्यास नकार दिला. यानंतर, संदीप रहांगडाले यांच्या सांगण्यावरून गावातील पोलीस पाटलांना AISF शी संबंधित विद्यार्थ्यांच्या घरी पाठवण्यात आले. एका विद्यार्थिनीच्या घरी गेलेल्या पोलीस पाटलाने "तुमची मुलगी AISF मध्ये काम करत असून नक्षलवादी आहे आणि साहेबांनी तिचे आधार कार्ड मागितले आहे," असे सांगत आधार कार्डची मागणी केली. तसेच त्या विद्यार्थिनीला संघटनेपासून दूर राहण्याचा सल्लाही दिला. यामुळे त्या विद्यार्थिनीच्या कुटुंबात भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि आधार कार्ड मागून घेण्यात आले.

> "भंडारा पोलिसांकडून करण्यात आलेला हा प्रकार अत्यंत दुर्दैवी आणि निंदनीय आहे. AISF ही देशाच्या इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग आहे आणि अशा संघटनेच्या सदस्यांना नक्षलवादी ठरवणे हे लोकशाही मूल्यांवर हल्ला करण्यासारखे आहे. आम्ही या घटनेचा तीव्र निषेध करतो आणि दोषींवर तातडीने कारवाईची मागणी करतो." –
> **कॉम्रेड वैभव चोपकर, राज्याध्यक्ष, AISF महाराष्ट्र राज्य कौन्सिल.**

**AISF चा तीव्र निषेध**

या घटनेची माहिती मिळताच ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनचे राज्याध्यक्ष कॉम्रेड वैभव चोकर यांनी पोलीस अधीक्षक नुरुल हसन आणि संबंधित ठाणेदारांशी संपर्क साधून घटनेचा तीव्र निषेध केला. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली. मात्र, अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नसल्याने AISF ने नाराजी व्यक्त केली आहे. AISF ने आरोप केला आहे की, पोलीस दडपशाहीचा वापर करून विद्यार्थी चळवळीला दाबण्याचा प्रयत्न करत आहेत.

**पोलिसांवर प्रश्नचिन्ह**

AISF ने म्हटले आहे की, भंडारा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर रेती तस्करी, अवैध दारू, गांजा आणि इतर नशेच्या वस्तूंची विक्री वाढली आहे, तसेच गुन्हेगारीही वाढली आहे. याकडे पोलिसांचे लक्ष नाही, मात्र समाजासाठी काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना नाहक त्रास दिला जात आहे. जर पोलीस विभागाला डाव्या विचारसरणीच्या संघटनांचा अभ्यास नसेल आणि मार्क्सवादी व माओवादी यांच्यातील फरक समजत नसेल, तर जिल्ह्यातील संपूर्ण पोलीस विभागाचे समुपदेशन करण्यासाठी AISF तयार आहे, असे आव्हान संघटनेने केले आहे.

**AISF चा इतिहास**

AISF ही देशातील सर्वात जुनी आणि स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेली पहिली विद्यार्थी संघटना आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस, बटुकेश्वर दत्त, अरुणा असफ अली, इंद्रकुमार गुजराल, कर्पुरी ठाकूर यांसारख्या अनेक महान नेत्यांनी या संघटनेतून प्रेरणा घेऊन देशाची सेवा केली आहे. भगतसिंग, शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारधारेवर चालणारी ही संघटना गेली अनेक दशके विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर देशभरात कार्यरत आहे आणि लोकशाही मूल्यांचे जतन करत देशाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देत आहे.

आंदोलनाचा इशारा

कॉम्रेड वैभव चोपकर यांनी सांगितले की, भंडारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नुरुल हसन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे धडे देत आहेत, मात्र त्यांच्याच विभागातील कर्मचारी अज्ञानाने ग्रासलेले आहेत. त्यामुळे आधी त्यांनी त्यांच्याच विभागातील अज्ञान दूर करावे आणि नंतर विद्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे द्यावे. येत्या एका आठवड्यात संबंधित पोलीस कर्मचारी आणि पोलीस पाटलावर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा AISF ने दिला आहे.

## जिल्ह्यातील सन.२०२४-२५ मधील अनु.जाती व नवबौद्ध वस्तीतील मंजूर कामे त्वरित सुरू करावी.

### राजकुमार पडघान यांची निवेदनाद्वारे सि..इ.ओ.यांना मागणी.

महाराष्ट्र जीत

वाशीम(प्रविण पट्टेबहादुर) अनु.जाती व नवबौद्ध घटकातील वस्तीचा विकास व्हावा म्हणून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मुंबई यांचे आदेशान्वये वाशीम जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाचे वतीने वाशीम जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विकास होणे साठी दि.१४ फेब्रुवारी २५ रोजी आदेश काढून जिल्ह्यातील ३८० गावांसाठी विविध विकासकामांची २६९८.६० लाख रुपयांचा निधी देवून मंजूरात दिली.परंतु अद्यापही या विकास कामे सुरू केली नाहीत.तर मंजूर असलेली कामे सुरू करावी . अशी मागणी एका निवेदनाद्वारे दि.११सप्टेंबर रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांनी केली आहे.पुढे राजकुमार पडघान यांनी निवेदनात असे नमूद केले आहे की, पुन्हा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे आदेशान्वये वाशीम जिल्हा परिषदेने दि.२५ मार्च २५ रोजी जिल्ह्यातील वाशीम,मंगरूळपीर, मालेगाव, रिसोड व कारंजा या तालुक्यातील गावांच्या अनु.जाती व नवबौद्ध घटकातील वस्तीचा विकासासाठी सिमेंट रस्ता बांधकामासाठी २९ गावांसाठी एकूण २६७.०० लाख रुपयांचा निधी मंजूर करून दिला आहे. तरी सुद्धा विकास कामांना सुरुवात नाही.म्हणून जिल्ह्यातील सिमेंट रस्ता बांधकामासाठी दि.१४ फेब्रुवारी व दि.२५ मार्च २५ या दोन्ही आदेश आपल्या जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीचे असूनही कामे सुरू केली नाहीत.या दोन्हीही आदेशान्वये जिल्ह्यातील अनु.जाती व नवबौद्ध घटकातील वस्तीचा विकासासाठी २९६५.६ लाख रुपयांचा निधी मंजूर असूनही कामे नाहीत.म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांनी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना एका निवेदनाद्वारे त्वरीत सुरु करावी.अशी मागणी केली आहे.पुढे निवेदनात असेही नमुद केले आहे की,शासन एकीकडे अनु.जाती व नवबौद्ध घटकातील वस्तीचा विकास व्हावा म्हणून कोट्यवधी रुपये खर्च करते .परंतु कामे मंजूर असूनही त्या घटकांना विकासापासून वंचित ठेवल्या जाते. तरी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील अनु.जाती व नवबौद्ध घटकातील वस्तीचा विकास करावा अशी मागणी एका निवेदनाद्वारे डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांनी केली आहे.नसता संविधानिक मार्गाने आंदोलन करावे.लागेल.



## मरखेल येथे मोहम्मद पैगंबर यांची 1500 वी जयंती उत्सव साजरी

महाराष्ट्र जीत

**देगलूर प्रतिनिधी/संघपाल मदने**

देगलूर तालुक्यातील मरखेल येथे दिनांक १० सप्टेंबर रोजी मरखेल येथे मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने नबी महंमद पैगंबर यांची पंधराशे वी जयंती मोठ्या हर्षवल्लसाने साजरी करण्यात आली या कार्यक्रमांचे अध्यक्ष ज्येष्ठ नागरिक यासीन शेठ हे होते प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षण सभापती व्यंकटराव पाटील गोरेगावकर, मरखेल पोलीस स्टेशनचे सं.पो.नि.रवी हुंडेकर सर ,पंडित गवाले सरपंच मरखेल संदीप पाटील उपसरपंच मरखेल मानवी हक्क अभियानाचे राज्य कार्याध्यक्ष मच्छिंद्र गवाले माझी पंचायत समिती सदस्य मधुकर रेडी ,माझी उपसरपंच मन्नासेठ ,माजी उपसरपंच पंढरी चेपुरे ज्येष्ठ नागरिक मधुकर सावकार लाखे, नंदकुमार धुमाळे, मनोहर पाटील तंटामुक्ती अध्यक्ष गंगाधर रावसाहेब, मरखेल गावांचे पोलीस पाटील गंगाधर गवाले ,ग्रामपंचायत सदस्य बलभीम रावसाहेब ,संजय रेड्डीचे पुरे , भरत पाटील,संतोष नामावाड, बालाजी नामावाड व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते याप्रसंगी मोहम्मद पैगंबर यांच्या जीवन आणि त्यांच्या मानवते संदर्भात असलेले विचार मांडणयात आले .आलेल्या मान्यवरांचे सत्कार केल्यानंतर गावातील मुख्य रस्त्याने महंमद पैगंबर यांच्या नावाने जयघोषात मिरवणूक काढण्यात आले .या कार्यक्रमाचे आभार नुसरत सर यांनी मांडले तर कार्यक्रमाचं संचलन जाकेर सर यांनी केले प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉक्टर मच्छिंद्र गवाले यांनी नबी मोहम्मद पैगंबर यांच्या शिकवणीची व त्यांच्या कार्याची सविस्तर माहिती दिले आणि त्यांचे शिकवण आज सर्व समाज बांधवांना प्रेरक आहे . त्यांच्या शिकवणीचे अनुकरण करण्याचे आव्हान केले .या कार्यक्रमासाठी गफार शेठ व त्यांची टीम यांनी परिश्रम घेतले.



## रोटरी क्लब ऑफ कात्रज पुणे यांच्यातर्फे भव्य पेंटींग प्रदर्शन

**प्रतिनिधी श्याम जगताप**

रोटरी क्लब ऑफ पुणे कात्रज हा डिस्ट्रिक्ट 3131 मधील एक नावाजलेला क्लब आहे. गेल्या तीस वर्षात या क्लबने सामाजिक बांधिलकी जाणून, अनेक लोकोपयोगी प्रकल्प हाती घेऊन तडीस नेले आहेत. या वर्षी आपण कोंढवा येथील बाळासाहेब देवरस पॉलीक्लिनिक ला डायबेटीक फूट व Artificial Limb या साठी मदत करण्याचे ठरविले आहे. त्या साठी निधी ची आवश्यकता आहे. आपले मानद सदस्य आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे वॉटर कलर आर्टिस्ट श्री.मिलिंद मुळीक यांच्या paintings चे प्रदर्शन 14 व 15 September रोजी बालगंधर्व, कलादालन येथे भरवणार आहोत. आमच्या क्लबचे आर्टिस्ट श्री दिलीप पंडित (Wild Life Photography) व सौ अंजली हुगे (Oil Painting) यांच्या कलाकृती पण या Exhibition मध्ये विक्री साठी ठेवल्या जातील. चित्रकलेला लोकाश्रय मिळावा, रसिक जना मधे चित्र खरेदीचा उत्साह(awareness) निर्माण व्हावा हा सुद्धा उद्देश या प्रदर्शनात मागे आहे. Charitable cause साठी म्हणून चित्रे, प्रत्यक्ष दरापेक्षा माफक दरात विक्री साठी ठेवण्यात येणार आहेत. तरी जास्तीत जास्त संख्येने आपण या प्रदर्शनाला यावे आणि ही दुर्मिळ चित्रे खरेदी करावीत ही विनंती. आपण सर्व जण या noble cause साठी भरभरून मदत कराल हा विश्वास वाटतो.

## जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांना सुधारित आस्वासित सुधारीत प्रगती योजनेचा लाभ मिळणार.. अमोल पाटील.

महाराष्ट्र जीत

**कारंजा / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांना सरकारने सुधारीत आस्वासित प्रगती योजनेचा लाभ द्यावा यासाठी वाशीम जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी संघटने कडून पाठपुरावा केला असून आज दिनांक ११/०९/२०२५ रोजी वाशिम जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामपंचायत अधिकारी यांना सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा पहिला, दुसरा व तिसरा लाभ जिल्हा परिषद वाशिमचे मुख्यकार्यकारी अधिकारी अर्पित चौहाण यांच्या आदेशाने मंजुर करण्यात आला व याबतचा आदेश निर्गमित करण्यात आला असल्याची माहिती गमपंचायत संघटनेचे जिल्हा अध्यक्ष अमोल पाटील इडोळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे ग्रामपंचायत अधिकारी पदोन्नती नंतर लगेच सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ जिल्हा परिषद प्रशासनाकडून देण्यात आला. या सेवा विषयक प्रश्नासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन डि.एन.ई १३६ ग्रामपंचायत अधिकारी संघटना जिल्हा शाखा वाशिम ने याबाबत पाठपुरावा केला असून त्यांना याकामी यश आले आहे यां सुधारित आश्वासित प्रगती योजनेत पात्र ग्रामपंचायत अधिकारी व विस्तार अधिकारी पंचायत यांना या पासून लाभ होणार आहे. याकामी जिल्हा परिषद वाशिम चे उपमुख्यकार्यकारी अधिकारी (पंचायत) आत्मारामजी बांद्र, सहाय्यक गटविकास अधिकारी गजानन खुळे व अधिक्षक अमोल कापसे व आस्थापना लिपीक देवानंद धनत्र यांनी सहकार्य केले. यावेळी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन डि.एन.ई १३६ जिल्हा शाखा वाशिम व सहाही तालुका शाखचे पदाधिकारी यावेळी उपस्थित हाते व त्यांनी जिल्हा परिषद प्रशासनाचे संघटनेच्या वतीने आभार व्यक्त केले अशी माहिती अमोल पाटील इडोळे यांनी दिली.

## अमरावती विभागाचे शिक्षक आमदार किरणराव रामराव सरनाईक यांची मुलजी जेठा मराठी हायस्कूल कारंजाला भेट

**महादेव जाधव महाराष्ट्र जीत**

.अमरावती विभागाचे शिक्षक आमदार यानी शिक्षकाचे मुद्दे पदवीधर शिक्षक तसेच सर्व शिक्षकांचे प्रश्न जाणून घेतले आहे. शाळेसाठी लागणार्या सेवा व सुविधा यावर आढावा बैठक घेतली आहे .मुख्याध्यापक के .डी .वानखेडे सर यांनी आमदार साहेबांचे स्वागत केले. तसेच मुख्याध्यापकांचे स्वागत संतोष ब्रह्मकुळे सर यांन्ही केले आहे शिक्षक व सर्व शिक्षिका व कर्मचारी यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाला सुरुवात झाली .यांनी अंशकालीन निर्देशक श्री सचिन प्रकाश हाते कला शिक्षक मुलजी जेठा नगर परिषद मराठी हायस्कूल कारंजा लाड आणि वाशिम जिल्हा कला क्रिडा कार्यानुभव अंशकालिन शिक्षक संघटना अध्यक्ष . मुलजी जेठा नगरपरिषद मराठी हायस्कूल कारंजा भेट दिली असता माननिय शिक्षक आमदार साहेब यांना अंशकालीन निर्देशक शिक्षकांच्या व्यथा मांडल्या व आपण अंशकालीन व पदवीधर शिक्षक यांच्या कामा कडे लक्ष द्यावे . आमचे ही प्रश्न मार्गि लावावेत असे अध्यक्ष अंशकालीन निर्देशक शिक्षक यांन्ही सुचवले आमदार साहेब यांनी निवेदन तयार करुन मला द्यावे व आता कोनत्या सुधारित मागन्या आहेत त्यावर काम करावे लागेल हे निवेदनात लिहुन द्यावे तसेच त्या साठी मी काम करेल व आपन ही मला काहि अडचनीअसल्यास मला सांगा सचिन हाते कलाशिक्षक व अर्चना ढेरे मॅडम या दोघांना संपर्क प्रमुख पद (शाळा) नियुक्ती पत्र दिले. शिक्षक संघटनेसाठी काम करा व आपले काम माझ्याकडे आणावं तसेच अंशकालिन निदर्शकांचे व शिक्षकांचे जीआर बदल मुद्दे आहेत ते माझ्याकडे आणावे मी त्यावर काय मागदर्शन व काही मुद्दे वर सुधारणा करण्याचा प्रयत्न करता येईल त्या साठि मी मदत करेल . आज आपले अंशकालीन शिक्षकांच्या प्रश्नासाठी सर्व शिक्षक एकत्र आले पाहिजे असे त्यांना मी म्हटले. सर्वांना पगार मिळत आहे.व आम्हाला तूट पुंज्या मानधनावर काम कराव लागत आहे. अर्धवेळ शिक्षक म्हणुन हे अंशकालीन निर्देशकाचे पद आहे. चार चार महिने मानधन मिळत नाही . वेळेवर मानधन व्हावे त्यासाठी आपली मदत लागेल असे मी त्यांना म्हटले मा. शिक्षक आमदार साहेबा यांनी मला भेटायला या निवेदन द्या आणि मी आपला हा प्रश्न माननिय मुख्यमंत्री साहेब.माननिय शिक्षक मंत्री साहेब यांच्या पर्यंत आपले मुद्दे घेऊन जाईल व आपले अंशकालीन निर्देशकाचे मुद्दे मार्गी लावेल .असे शाळेला भेट दिली असता शिक्षकांना असेच पुढे पण आपल्यासाठी काम करेल असे आश्वासन दिले आहे.असे आमच्या शाळेतील सर्व शिक्षकांना आमदार साहेब यांनी मागदर्शन केले. तसेच आभार प्रदर्शन अली सर यांनी केले आहे

## शेंद्री बु ते घनापूर रस्त्याचे डांबरीकरण करा बहुजन मुक्ती पार्टीने दिले निवेदन

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे**

दारव्हा मागील काही वर्षापूर्वी शेंद्री बु ते घनापूर वसंत हायस्कूल कडे जाणाऱ्या पांदन रस्त्याचे मातीकाम, खडीकरण व डांबरीकरण सुद्धा करण्यात आले होते.परंतु एक किलोमीटर अंतराच्या या रस्त्यावर वसंत हायस्कूल शेंद्री बु नावाची वर्ग पाच ते दहा पर्यंत ची शाळा असल्यामुळे डांबरीकरण करण्यात आले होते परंतु आज रोजी एक किलोमीटर अंतरापैकी अर्धा किलोमीटर म्हणजे पाचशे ते सहाशे मिटर अंतराच्या रस्त्यावरील डांबर शिल्लक न राहता संपूर्ण खड्डामय व रस्त्यावर माती पसरली असून त्यारस्त्यावरून पाऊस असल्यास शेतकऱ्यांना ये जा करता येत नाही त्याच रस्त्यावर वसंत हायस्कूल शेंद्री बु ही शाळा असल्यामुळे विध्यार्थ्यांना पायी सुद्धा चालता येत नाही. अशी परिस्थिती रस्त्याची निर्माण झाली आहे. या शाळेमध्ये शिकणारे विध्यार्थी हे शेंद्री बु,डोल्हारी,टाकळी खु,शहापूर,शेंद्री खु,पेकर्डा या गावातील अत्यंत गरीब, मोलमजुरी करणारे व शेतकरी कुटुंबातील असून शाळेत जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे विध्यार्थी शाळेत जाण्यास धजावत नाही त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.त्यामुळे वरील विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून त्वरित शेंद्री बु ते घनापूर वसंत हायस्कूल कडे जाणाऱ्या पाचशे ते सहाशे मिटर अंतराच्या पांदन रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे अन्यथा शेंद्री बु,डोल्हारी,टाकळी खु,शहापूर,शेंद्री खु,पेकर्डा येथील पालक व विध्यार्थी तसेच शेंद्री येथील शेतकऱ्यांसह बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल.अशा आशयाचे निवेदन बिमोद विठ्ठलराव मुधाने बहुजन मुक्ती पार्टी अध्यक्ष लोकसभा यवतमाळ /वाशीम तथा प्रभारी दारव्हा दिग्रस नेर विधानसभा मतदारसंघ यांच्या नेतृत्वात देण्यात आले.त्यावेळी ओंकार मनवर,प्रेमदीप मनवर,आशिष पुसांडे, पृथ्वीनंदन जाधव,प्रफुल मनवर उपस्थित होते. तर निल कांबळे,आयुष्य ठाकरे,अनिकेत कांबळे,अंजली मोहाडे,गणेश बन,चैतन्य खतिक, अमृता राऊत,डिम्पल ठाकरे,अभिषेक जैस्वाल, बादल राठोड, रुपेश चंदेल,रोहित पवार, रेश्मा पवार, गायत्री मनकाळे, कार्तिक खाडे, चेतन चिंचे, ओम राठोड, केतन राठोड, विशाल पवार, प्रांजली जाधव, भूमिका तुरी, परी असमेलवार, वैष्णवी उघडे, अपूर्वा पुनसे, रोशनी जाधव, काजल आखर, कोमल डोंगरे, वैष्णवी पवार, साहिल खाडे, ज्ञानेश्वरी साबळे, अमन बन्सोड, गौरी आखर, नागेश बन, दीपिका राठोड, मिलिंद शिंदे, अंश बोकडे, दिव्या वाहूरवाघ, सार्थक इंगळे,अजय जगताप, विकास जाधव, गुंजन अवचार, राधिका राऊत, विजयी बुरळे, ऋतिका राठोड, आरती आडे, आचल राठोड, प्रगती पवार, पल्लवी राठोड, मंथन मडसे व पालक, विध्यार्थी अशा अनेकांच्या सह्यानिशी निवेदन देण्यात आले..




## खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांच्या वाहनाला भीषण अपघात, थोडक्यात बचावले.

### नागपूर बायपासवर उमरेड फाट्याजवळ पहाटेची घटना; सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह.

महाराष्ट्र जीत

**जीत महाराष्ट्र / हंसराज भंडारा.**

**भंडारा** : उपराष्ट्रपती पदाची निवडणूक आटोपून मुंबईमार्गे भंडाऱ्याकडे परतत असताना भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांच्या वाहनाला आज पहाटे नागपूर बायपासवरील उमरेड फाट्याजवळ भीषण अपघात झाला. सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या अपघातातून डॉ. पडोळे थोडक्यात बचावले असून त्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. त्यांची फॉर्च्युनर (एमएच 36 एपी 9911) गाडीचे मात्र मोठे नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. पडोळे दिल्ली येथे उपराष्ट्रपती पदासाठी मतदान करून विमानाने मुंबईला पोहोचले होते. तेथे कार्यालयीन कामे आटोपून ते आपल्या वाहनाने भंडाऱ्याकडे परतत असताना नागपूर बायपासवरील उमरेड फाट्याजवळ अचानक समोरून आलेल्या एका वाहनामुळे त्यांच्या चालकाचे नियंत्रण सुटले आणि जोरदार धडक बसली. अपघात इतका गंभीर होता की गाडीचे मोठे नुकसान झाले, परंतु सुदैवाने खासदार डॉ. पडोळे आणि त्यांच्यासोबत असलेले सहकारी सुखरूप आहेत. या घटनेची माहिती मिळताच त्यांच्या समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य केले आणि वाहन रस्त्याच्या कडेला हलवण्यात आले. डॉ. पडोळे यांना तातडीने उपचार देण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.



**सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह:**

भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राचा बराचसा भाग नक्षलग्रस्त आहे. अशा परिस्थितीतही खासदारांना अद्याप शासकीय सुरक्षा व्यवस्था पुरवण्यात आली नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. भाजप सरकारकडे वारंवार मागणी करूनही सुरक्षा न मिळाल्याने या अपघातानंतर पुन्हा एकदा सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. काँग्रेस कार्यकर्त्यांनी "सरकारला आता तरी जाग येईल का?" असा सवाल करत प्रशासनाने या अपघातातून बोध घेऊन नक्षलग्रस्त भागातील दौऱ्यांसाठी पोलीस सुरक्षा बळकट करण्याची मागणी केली आहे. जनतेतूनही खासदारांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. या अपघाताबाबत पुढील चौकशी सुरू आहे.